॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

■ अहिल्यानगर ■ बुधवार, दि. २८ ऑक्टोबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक १११ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com


**✻ सुविचार ✻**

स्वप्न ती नसतात जी झोपेत पडतात, स्वप्न ती असतात जी तुम्हाला झोपू देत नाहीत.

## फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### भीमाशंकर

इकडे दुष्काळाचं सावट
तिकडे जंगलतोड कशी?
स्वाभिमान आहे महत्वाचा
नको उद्योगपतीची खुशी

भाव पाहायची सवय असणाऱ्यानो
भविष्यात मोजावी लागेल किंमत
बघूच भीमाशंकर झाडे तोडीची
महाराष्ट्रात नेमकी कुणात हिंमत?

## SPOT NEWS

### देशावर आता अर्णव चक्रीवादळाचे सावट

● **नवी दिल्ली** – बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले 'अर्णव' चक्रीवादळ अधित तीव्र होत चालले आहे. त्यामुळे सरकारने पूर्व किनारपट्टीवरील राज्यांमध्ये हाय अलर्ट जारी केला असून मंगळवारी ओडिशातील अनेक भागांमध्ये वादळी वा-यासह मुसळधार पावसाने थौमान घातले आहे. 'अर्णब' हे अती तीव्र चक्रीवादळ पूर्वेकडील किनारपट्टीच्या दिशेने सरकत असून पुढील २४ तासांत आंध्र प्रदेशच्या किनाऱ्यावर धडकण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. हवामान खात्याने गंजाम, गजपती, रायगडा, मलकानगिरी, कोरापुट आणि नबरंगपूर या सहा जिल्ह्यांसाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला आहे. या जिल्ह्यांमध्ये १२ ते २० सेंटीमीटरपर्यंत अतिवृष्टी होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे खबरदारी म्हणून या सहा जिल्ह्यांतील शाळा, महाविद्यालये आणि अंगणवाडी केंद्रे २८ आणि २९ ऑक्टोबर रोजी बंद ठेवण्यात येणार आहेत. तसेच बालासोर, भद्रक, जाजपूर, कटक यांसारख्या १६ जिल्ह्यांसाठी 'येलो अलर्ट' देण्यात आला असून तिथे ४ ते ११ सेंटीमीटर पाऊस पडू शकतो, असा अंजाद हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे.

### एसआयआर प्रकरणाची सुनावणी दिवाळीनंतर

● **नवी दिल्ली** – एसआयआर प्रक्रियेसह निवडणूक आयोगाच्या निर्णयांना आव्हान देणा-या याचिकांवरील सुनावणी सर्वोच्च न्यायालयाने पुढे ढकलली आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी, एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी आणि विरोधी पक्षांतील अन्य नेत्यांनी या प्रकरणी याचिका दाखल केल्या आहेत. या याचिकांवर आता दिवाळीनंतर सुनावणी होणार असून १७ नोव्हेंबर रोजी सुनावणी होण्याची शक्यता आहे. या प्रकरणात निवडणूक आयोगाने सोमवारी सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करून आपल्या निर्णयांचा बचाव केला. एसआयआर संदर्भातील तिन्ही आदेश आयोगाच्या सर्व सदस्यांच्या सहमतीने घेण्यात आले होते, असे आयोगाने स्पष्ट केले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी एकतर्फी निर्णय घेतल्याच्या आरोपांचेही आयोगाने खंडन केले.

# किसान सभेचा अकोले-मुंबई लाँग मार्च शहापूरमध्ये स्थगित

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतच्या बैठकीत विविध मागण्यांवर सकारात्मक आश्वासने । ४ नोव्हेंबरला पुन्हा बैठक

● **मुंबई । वीरभूमी–**
शेतकरी, शेतमजूर, आदिवासी, कामगार, महिला आणि कष्टकरी जनतेच्या विविध मागण्यांसाठी २६ ऑक्टोबरपासून सुरू झालेला किसान सभेचा अकोले ते मुंबई वाहन लाँग मार्च शहापूर येथे स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अकोले ते शहापूर हे अंतर पार केल्यानंतर मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत विविध मागण्यांवर चर्चा झाली. त्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.



मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली दोन्ही उपमुख्यमंत्री, पाच मंत्री, संबंधित विभागांचे सचिव आणि किसान सभेच्या शिष्टमंडळाची सुमारे दोन तास बैठक झाली. या बैठकीत विविध मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. अनेक मागण्यांबाबत ठोस आश्वासने आणि सकारात्मक निर्णय मिळाल्याचे किसान सभेने सांगितले. मान्य मागण्यांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी ४ नोव्हेंबर रोजी पुन्हा बैठक होणार आहे.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीच्या (छऊठऋ) निकषांपलीकडे जाऊन मदत देण्याबाबत तसेच नमो शेतकरी महासन्मान निधीचे थकीत दोन हप्ते वितरित करण्याबाबत सरकारने ठोस आश्वासन दिल्याचे किसान सभेने म्हटले आहे.

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना मिळणाऱ्या ५० हजार रुपयांच्या प्रोत्साहन अनुदानात वाढ करण्याच्या मागणीवर कर्जमाफी उपसमितीशी चर्चा करून सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. पीक विमा योजनेतील रद्द केलेले ट्रिगर पुढील वर्षी पुन्हा लागू करण्याबाबतही मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक भूमिका मांडल्याचे सांगण्यात आले.

वनजमीन, वरकस जमीन, गायरान जमीन, देवस्थान जमीन, घरांच्या तळजमिनी आणि वर्ग दोनच्या जमिनींसंबंधीच्या प्रश्नांवर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आवश्यक कायदे आणि शासन निर्णय करण्याबाबत सहमती दर्शविण्यात आल्याचे किसान सभेने नमूद केले.

बाळ हिरड्याच्या सरकारी खरेदीसाठी किसान सभेच्या प्रतिनिधींचा समावेश असलेला अभ्यास गट स्थापन करण्याचे आश्वासन देण्यात आले. आदिवासींना भंडारदरा धरणाचे पाणी उपलब्ध करून देणे आणि इको सेन्सिटिव्ह झोन रद्द करण्याच्या मागण्यांवरही चर्चा झाली.

केवायसीअभावी लाभापासून वंचित राहिलेल्या ८१ लाख लाडक्या बहिणींना पुन्हा योजनेत समाविष्ट करावे आणि केवायसी प्रक्रिया सुरू ठेवावी, अशी मागणी करण्यात आली. यावर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले. केवायसी पूर्ण असूनही मानधन किंवा आर्थिक लाभ न मिळालेल्या पात्र महिलांचा लाभ तातडीने सुरू केला जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याचे किसान सभेने म्हटले आहे.

शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांची दरमहा एक हजार रुपयांची मान्य मानधनवाढ लागू करणे आणि मानधनात आणखी वाढ करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेणे, बांधकाम कामगारांची मेडिक्लेम योजना पुन्हा सुरू करणे, तसेच पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती योजना सुरू करण्याबाबत निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले.

पेसा मोबिलायझर कर्मचाऱ्यांचे वेतन बचत गटांमार्फत न देता थेट त्यांच्या बँक खात्यांत जमा करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे सांगण्यात आले. त्यांचे थकीत मानधन तातडीने देण्याबाबतही निर्णय घेण्यात आला.

अर्धवेळ परिचर, आशा कर्मचारी, अंगणवाडी कर्मचारी आणि ग्रामरोजगार सेवकांच्या विविध मागण्यांवरही सकारात्मक चर्चा झाली. निराधार, वृद्ध, विधवा आणि दिव्यांग व्यक्तींच्या मानधनात वाढ करावी आणि त्यांनाही लाडकी बहीण योजनेप्रमाणे आर्थिक लाभ द्यावा, या मागणीवर सरकार सकारात्मक विचार करेल, असे आश्वासन देण्यात आल्याचे किसान सभेने सांगितले.

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्याचा आग्रह किसान सभेने धरला होता. हा आग्रह मान्य झाल्यानंतर आणि विविध मागण्यांबाबत आश्वासने मिळाल्याने २७ ऑक्टोबरच्या रात्री उशिरा वाहन लाँग मार्च स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

मात्र, आंदोलन स्थगित झाले असले तरी संघर्ष संपलेला नाही. सरकारने दिलेल्या आश्वासनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करून घेण्यासाठी आणि उर्वरित मागण्यांसाठी किसान सभा पाठपुरावा व संघर्ष सुरू ठेवणार असल्याचे संघटनेने स्पष्ट केले.

बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, तसेच मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राधाकृष्ण विखे पाटील, गिरीश महाजन, दत्तात्रय भरणे आणि अन्य मंत्री उपस्थित होते. विविध विभागांचे सचिव व पोलीस अधिकारीही बैठकीला उपस्थित होते.

किसान सभेच्या शिष्टमंडळात डॉ. अशोक ढवळे, जे. पी. गावित, आमदार विनोद निकोले, डॉ. अजित नवले, यशवंत झाडे, उमेश देशमुख, सदाशिव साबळे, किरण गहला, इंद्रजीत गावित, इरफान शेख, डॉ. अमोल वाघमारे, अर्जुन आडे, शंकर सिडाम, अजय बुरांडे, रडका कलांगडा, उद्धव पौळ, चंदू धांगडा, नामदेव भांगरे, प्राची हातिवलेकर, लहानी दौडा, श्यामसिंग पाडवी, नंदू डहाळे, रविता पाडवी, अशोक पांडे, संगीता साळवे, हेमलता शेळके, सचिन ताजणे, संतोष मुंडे आणि एकनाथ मेंगाळ यांचा समावेश होता.

# दुष्काळामुळे राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका स्थगित

● **मुंबई । वीरभूमी–**
महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागाने मोठा निर्णय घेतला. दुष्काळग्रस्त जिल्ह्यांतील सहकारी संस्थांच्या निवडणुका स्थगित करण्यात आल्या आहेत. सहकार विभागाने शासन आदेश देखील जारी केला आहे. राज्यातील ३०४ तालुक्यामध्ये दुष्काळ जाहीर झाल्यानंतर सरकारने हा निर्णय घेतला आहे. मदतकार्यावर परिणाम होऊ नये म्हणून निवडणुका थांबवल्याचा सरकारने दावा केला.



सहकारी गृहनिर्माण संस्था आणि न्यायालयीन आदेश असलेल्या संस्था स्थगितीतून वगळल्या असल्याची माहिती देखील समोर आली आहे. ज्या संस्थांचा नामनिर्देशनाचा टप्पा २७ ऑक्टोबरपूर्वी सुरू झाला त्यांच्या निवडणुका सुरू राहणार असल्याची माहिती सहकार विभागाकडून देण्यात आली. सहकार कायद्याच्या कलम ७३ क नुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात न झालेल्या निवडणुका सध्याच्या टप्प्यावरूनच थांबणार आहे.

आदेशामधून सहकारी गृहनिर्माण संस्था, मा. उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयाने निवडणुका घेण्याचे स्पष्ट आदेश दिलेल्या संस्था, तसेच ज्या संस्थांच्या निवडणुकीतील अर्ज दाखल करण्याचा टप्पा २७ ऑक्टोबर २०२६ पूर्वीच सुरू झालेला आहे अशा संस्थांच्या निवडणुकांना या स्थगितीतून वगळण्यात आले आहे. सध्या सुरू असलेली अहिल्यानगर, सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्हा बँकेची निवडणुकीत फक्त मतदान बाकी असल्याने या निवडणुकीला स्थगिती देण्यात आली नाही.

दुष्काळग्रस्त भागांमध्ये निवडणूक प्रक्रिया सुरू ठेवल्यास शासकीय अधिकारी आणि कर्मचारी निवडणूक कामात व्यस्त होतात. त्याचा थेट परिणाम दुष्काळ निवारण आणि मदतकार्यावर होण्याची शक्यता असते. त्यासोबतच दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आणि सभासद अडचणीत आलेले आहेत. या सर्व गोष्टी लक्षात घेऊनच सरकारने या निवडणुका स्थगित करण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलमांच्या तरतुदींनुसार शासनाने आपल्या विशेष अधिकारांचा वापर केला आणि निवडणुकीला स्थगिती दिली.

# २९ ऑक्टोबरपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार ५ हजार रुपये

## मंत्रीमंडळाचा शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय

● **मुंबई । वीरभूमी–**
महाराष्ट्र सध्या महादुष्काळात होरपळत आहे. त्यामुळे सरकारकडून मदतीच्या अपेक्षा वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने १४ ऑक्टोबरला शेतकऱ्यांना ५ हजार रुपये मदत करणार असल्याची घोषणा केली होती. या संदर्भात आजच (२७ ऑक्टोबर) राज्य मंत्रिमंडळाने निर्णय घेत ५ हजार रुपये अग्रीम म्हणून देण्याचा निर्णय घेतला आहे. शिवाय ही रक्कम दोन दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाईल, हेही स्पष्ट केले आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात दिवाळीपूर्वी ५ हजार रुपये जमा होतील आणि दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, अशी सरकारला अपेक्षा आहे.

महाराष्ट्र सरकारने राज्यातील ३०५ तालुके दुष्काळग्रस्त जाहीर केले आहेत. त्यामुळे दुष्काळाच्या सवलती देण्याची जबाबदारी सरकारची आहे. पण शेतकऱ्यांचा खरीप हंगाम वाया गेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बिकट झाली आहे. शिवाय तोंडावर दिवाळीचा सण आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी ५ हजार रुपये देण्याची घोषणा सरकारने दोन आठवड्यांपूर्वी केली होती. त्याचा निर्णय आजच्या (२७ ऑक्टोबर) मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. शेतकऱ्यांना दोन दिवसांत म्हणजे गुरुवारपर्यंत (२९ ऑक्टोबर) शेतकऱ्यांच्या खात्यात ५ हजार रुपये अग्रीम म्हणून जमा करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.नकाशे पहा

शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या अग्रीम ५ हजार रुपयांचा लाभ राज्यातील दीड कोटी शेतकऱ्यांना मिळणार आहे. त्यासाठी सरकार ७ हजार ५०० कोटी रुपये खर्च करणार आहे. ही रक्कम दोन दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा होणार असून फार्मर आयडी असलेल्या शेतकऱ्यांच्या खातात रक्कम जमा होणार. ज्यांच्याकडे फार्मर आयडी नाहीत त्यांना केवायसी करावी लागणार आहे.

महत्त्वाचे म्हणजे बँकांना अग्रीम रकमेतून वजावट न करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, असेही सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहेत.

# महावितरणच्या कंत्राटी वीज कामगारांचे धरणे आंदोलन; ६ नोव्हेंबरपासून बेमुदत कामबंदचा इशारा

## वेतनातील तफावत दूर करून थकीत रक्कम देण्याची मागणी । अपघात विमा, भत्ते आणि समान कामासाठी समान वेतनाचा मुद्दा ऐरणीवर

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**
महावितरणमधील कंत्राटी वीज कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या (संलग्न भारतीय मजदूर संघ) वतीने अहिल्यानगर येथील महावितरण कार्यालयासमोर धरणे आंदोलन व निदर्शने करण्यात आली. कामगारांच्या मागण्यांची तातडीने पूर्तता न झाल्यास ६ नोव्हेंबर २०२६ पासून राज्यभर बेमुदत कामबंद आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला.

आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात २७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रकाशगड, कामगार आयुक्त कार्यालय तसेच राज्यातील विविध झोन व सर्कल कार्यालयांसमोर काळ्या फिती लावून लाक्षणिक निदर्शने करण्यात आली. याच आंदोलनाचा भाग म्हणून अहिल्यानगर येथे कंत्राटी कामगारांनी एकत्र येत आपल्या मागण्यांसाठी आवाज उठवला.

यावेळी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे अध्यक्ष निलेश खरात, सरचिटणीस सचिन मेंगोळे, महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे जिल्हाध्यक्ष अनिल नजन, सर्कल सचिव गणेश कुंभारे, वीज कंत्राटी कामगार महासंघाचे जिल्हाध्यक्ष कृष्णा साठे, प्रदेश सचिव सचिन पाटील, जिल्हा कोषाध्यक्ष आशिष डहाणे, संघटनमंत्री इतेश देठे, दीपक चौधरी, संतोष शेळके यांच्यासह मोठ्या संख्येने कामगार सहभागी झाले होते.

महावितरणमध्ये नियमित कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरून काढण्याच्या कामात कार्यरत कंत्राटी कामगारांना वेळेवर वेतन मिळत नसल्याची तक्रार संघटनेने केली आहे. क्रिस्टल आणि स्मार्ट एजन्सीमार्फत काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांच्या वेतनात मोठी तफावत असल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला.

राज्य कामगार उपायुक्त चेतन जगताप यांच्या आदेशानुसार संबंधित कामगारांचे वेतन २१ हजार रुपये करून मागील वेतनातील फरकाची रक्कम द्यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. अनेक ठिकाणी एक ते पाच महिन्यांचे वेतन थकीत असल्याचा आरोपही करण्यात आला. दिवाळीपूर्वी थकीत वेतन आणि वेतनातील फरकाची रक्कम तातडीने द्यावी, तसेच कामगारांच्या वेतनासंबंधीचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवावा, अशी मागणी करण्यात आली.

एका विभागात १० ते १५ कंत्राटदारांना काम दिले जात असल्यामुळे प्रशासकीय गुंतागुंत वाढते आणि वेतन वितरणास विलंब होतो, असा आरोप संघटनेने केला. कंत्राटदारांकडून होणारे कथित आर्थिक व मानसिक शोषण थांबवून कामगारांना न्याय द्यावा, अशीही मागणी करण्यात आली.

वीज क्षेत्रात धोकादायक परिस्थितीत काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना किमान १० लाख रुपयांचे अपघात विमा संरक्षण व मेडिक्लेम योजना लागू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे पेट्रोल भत्ता, मोबाईल रिचार्ज भत्ता, रात्रपाळी भत्ता, खाकी गणवेश आणि धुलाई भत्ता देण्याची मागणीही संघटनेने केली.

कंत्राटी कामगारांच्या टेंडर प्रक्रियेत नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक सबस्टेशनवर चार ऑपरेटर, एक सफाई कामगार आणि एक सुरक्षारक्षक उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच कंत्राटी कामगारांच्या सेवाज्येष्ठतेनुसार LIFO (Last In, First Out) पद्धतीचा प्रश्न मार्गी लावावा, न्यायालयीन प्रकरणांमुळे संरक्षित असलेल्या कामगारांची नावे संपर्क पोर्टलवर लवकरात लवकर नोंदवावीत आणि समान कामासाठी समान वेतन लागू करावे, अशी मागणीही करण्यात आली.



संघटनेच्या म्हणण्यानुसार, गेल्या अनेक वर्षांपासून या प्रश्नांवर चर्चा सुरू आहे. मात्र, प्रशासनाकडून केवळ तोंडी आश्वासने दिली जात असून, बैठकांच्या लेखी इतिवृत्तात नमूद केलेल्या निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. वारंवार पाठपुरावा करूनही मागण्या पूर्ण होत नसल्याने कामगारांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे संघटनेने स्पष्ट केले.

प्रलंबित मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करावी; अन्यथा ६ नोव्हेंबर २०२६ पासून राज्यव्यापी बेमुदत कामबंद आंदोलन करण्यात येईल. या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीची जबाबदारी महावितरण प्रशासन आणि शासनाची राहील, असा इशारा संघटनेचे अध्यक्ष निलेश खरात आणि सरचिटणीस सचिन मेंगोळे यांनी दिला.

# SPOT NEWS

## गोसेवा संघाच्या जिल्हाध्यक्षपदी दीपक महाराज काळे यांची निवड

**● पाथर्डी । वीरभूमी–**



पाथर्डी तालुक्यातील शिरापूर येथील श्रीकृष्ण गोशाळेचे संस्थापक गोरक्षक दीपक महाराज काळे यांची अखिल भारत कृषी गोसेवा संघाच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. दीपक महाराज यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत श्रीकृष्ण गोशाळेच्या माध्यमातून अनेक गोमातांना चारा-पाणी उपलब्ध करून खऱ्या अर्थाने गोमातेची सेवा केली. आज रोजी श्रीकृष्ण गोशाळेमध्ये सुमारे ६०० हून अधिक गोमाता आहेत. काळे महाराजांकडून सुरू असलेली गोसेवा लक्षात घेता अखिल भारत कृषी व सेवा संघाच्या जिल्हाध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली. या निवडीबद्दल त्यांचा अखिल भारत कृषी गोसेवा संघाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष मिलिंद एकबोटे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. दिपक महाराज सर्व अडचणींवर मात करून चांगल्या प्रकारे गोसेवा करत असून, इथून पुढच्या काळातही जिल्ह्यात चांगले काम व्हावे, गोमातेचे रक्षण व्हावे, तिची सेवा प्रभावीपणे व्हावी, यासाठी प्रामाणिकपणे काम करेल, असा विश्वास जिल्हाध्यक्ष दीपक महाराज काळे यांनी व्यक्त केला. दीपक महाराज काळे यांच्या निवडीबद्दल त्यांचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री, संजय महाराज पाचपोर, गोसेवक, गोरक्षक समिती यांच्यासह अनेक संत-महंतांनी अभिनंदन केले आहे.

## वरुण कोल्हेचे रायफल शूटिंगमध्ये कांस्यपदक; राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

नागपूर येथे झालेल्या शालेय राज्यस्तरीय इंटर स्कूल रायफल शूटिंग स्पर्धेत अहिल्यानगरच्या वरुण कोल्हे याने कांस्यपदक पटकाविले. १७ वर्षांखालील मुलांच्या ओपन साईट एअर रायफल प्रकारात त्याने हे यश मिळविले. या कामगिरीच्या जोरावर त्याची गोवा येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नागपूर आणि प्रियदर्शनी भगवती अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने २३ ते २५ ऑक्टोबर २०२६ दरम्यान या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. राज्यातील विविध विभागांतील खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घेतला. वरुणच्या यशाबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. त्याला प्रशिक्षक अलीम शेख, ऋषिकेश दरंदले आणि सागर फाटके यांचे मार्गदर्शन लाभले. क्लबच्या सेक्रेटरी सुनीता लिपने यांनीही तयारीसाठी विशेष प्रयत्न केले. या यशाबद्दल पालकमंत्री राधाकृष्ण विखे, अपर जिल्हाधिकारी दादासाहेब गीते-पाटील, वरिष्ठ कक्ष अधिकारी लाड साहेब, सोल मॅडम, आमदार संग्राम जगताप, खासदार नीलेश लंके, क्रीडा मार्गदर्शक विशाल गर्जे, क्रीडा अधिकारी प्रियंका खिंडरे, संतोष वाबळे, कोमल वाकळे तसेच पालकांनी वरुणचे अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## वीज तांत्रिक कामगार पतसंस्थेतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगर यांच्या वतीने सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा शालेय पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करून त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहन देण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष प्रवीण देशमुख होते. अहिल्यानगर मंडळाचे अधीक्षक अभियंता रमेशकुमार पवार यांच्या हस्ते उद्घाटन झाले. प्रमुख उपस्थितांमध्ये जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे, किरण आव्हाड, तांत्रिक कामगार युनियन ५०५९ (महाराष्ट्र राज्य)चे सरचिटणीस प्रभाकर लहाणे, व्यवस्थापक सुदीप साळवे, पाथरकर काका, हवालदार साहेब, बारवकर साहेब, रघुनाथ तात्या लाड, माऊली बडदे आणि भारत साळुंखे यांचा समावेश होता. नाशिक परिमंडळाचे जनसंपर्क अधिकारी तथा प्रसिद्ध व्याख्याते विकास आढे यांनी विद्यार्थ्यांना करिअरविषयक मार्गदर्शन केले. दहावी-बारावीनंतर उपलब्ध शैक्षणिक व व्यावसायिक संधींची माहिती घेऊन स्वतः ची आवड, क्षमता आणि कौशल्ये ओळखावीत. स्पर्धा परीक्षा, तांत्रिक शिक्षण आणि कौशल्य विकासासाठी सातत्यपूर्ण अभ्यास, शिस्त व वेळेचे नियोजन आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. अपयशातून शिकत आत्मविश्वासाने पुढे जाण्याचे आवाहनही त्यांनी केले. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत पालक व शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेचे चेअरमन सतीश भुजबळ, सचिव अशोक मते, संचालक कुशाबा वायसे, संतोष शेलार, संतोष भिंगारदिवे, अरुण भोसले, रुपेश चाकणे, चंद्रकांत सुरवसे, बाबासाहेब भांड, दिनेश निकम, आजिनाथ शिरसाट, सुनील गुळमकर, सुनीता मेढे, सचिन चोरगे, आशिष वेळापुरे, कर्मचारी दिलीप घोडेचोर, दीपक हुशारे आणि संस्थेच्या सभासदांनी सहकार्य केले.

# गोरगरिबांची दिवाळी गोड करा; ग्राहक पंचायतीची मागणी

### अकोले तालुक्यातील शिधापत्रिकाधारकांना दिवाळीपूर्वी जीवनावश्यक वस्तू पुरविण्याची मागणी । नायब तहसीलदारांना निवेदन

**● अकोले । वीरभूमी –**

दुष्काळी परिस्थिती आणि वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जीवन कठीण झाले आहे. त्यामुळे अकोले या आदिवासीबहुल तालुक्यातील शिधापत्रिकाधारकांना दिवाळीपूर्वी गहू, तांदूळ, साखर, खाद्यतेल, तूरडाळ, हरभरा डाळ, रवा आणि मैदा या जीवनावश्यक वस्तू रास्त भावातील दुकानांमार्फत उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी ग्राहक पंचायत महाराष्ट्राच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भातील निवेदन अकोले महसूल विभागाचे नायब तहसीलदार प्रमोद सावंत यांना देण्यात आले. ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलीक, अध्यक्ष दत्ता शेनकर आणि सचिव राम रुद्रे यांनी ही माहिती दिली.



निवेदनात म्हटले आहे की, दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी, शेतमजूर, कामगार, कारागीर, फेरीवाले आणि वंचित घटकांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातच वाढत्या महागाईमुळे दैनंदिन गरजा भागविणेही अनेक कुटुंबांना कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून सर्वसामान्य कुटुंबांना आधार मिळणे आवश्यक आहे.

गरीब आणि गरजू कुटुंबांना सणासुदीच्या काळात दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने नियोजन करावे. गावोगावी असलेल्या रास्त भाव दुकानांमधून शिधापत्रिकाधारकांना आवश्यक वस्तू दिवाळीपूर्वी उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

अकोले तालुक्यातील आदिवासी व वंचित घटकांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन गहू, तांदूळ, साखर, खाद्यतेल, तूरडाळ, हरभरा डाळ, रवा आणि मैदा यांसारख्या वस्तू तातडीने उपलब्ध करून द्याव्यात. त्यामुळे गरीब कुटुंबांना दिवाळीचा सण साजरा करताना दिलासा मिळेल, असे ग्राहक पंचायतीने म्हटले आहे.

या निवेदनावर मच्छिंद्र मंडलीक, दत्ता शेनकर, महेशराव नवले, माधवराव तिटमे, राम रुद्रे, ज्ञानेश्वर पुंडे, पांडुरंग पथवे, रामदास पांडे, भाऊसाहेब आभाळे, विठ्ठल नवले, अनंत घाणे, सुरेश गभाले, जालिंदर बोडके, रामहारी तिकांडे, भाऊसाहेब गोर्डे, भाऊसाहेब वाकचौरे, अशोक उघडे, रामदास पवार, गणपत थिगळे, प्रकाश कोरडे, राजेंद्र घायवट, कैलास तळेकर, दत्ता ताजणे, प्रमोद मंडलीक, दत्ता मुठे आणि गणेश पोखरकर यांच्यासह इतरांची नावे आहेत.

निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ आणि अहिल्यानगरच्या जिल्हाधिकाऱ्यांना पाठविण्यात आल्या आहेत.

## महादजी शिंदे विद्यालयात कल्पकतेची रोषणाई!

### २३७ विद्यार्थ्यांचा आकाशकंदील निर्मिती कार्यशाळेत सहभाग

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

महादजी शिंदे विद्यालयात २३ ऑक्टोबर रोजी आयोजित आकाशकंदील निर्मिती कार्यशाळेत २३७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत रंगीबेरंगी आकाशकंदील व आकर्षक पणत्या साकारल्या. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासह पर्यावरणपूरक हस्तकलेची आवड निर्माण करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



कला विभागप्रमुख शरद शिरसाट आणि कलाशिक्षक कल्याण उल्हारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कागद, बांबूच्या काड्या आणि टाकाऊ वस्तूंचा वापर करून आकर्षक कंदील तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापक दिलीप भुजबळ, उपमुख्याध्यापक शहाजी एकाड, पर्यवेक्षिका सुनीता काकडे, सुधीर साबळे, विकास लोखंडे, सचिन झगडे यांच्यासह शिक्षक उपस्थित होते. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना मिळते, असे मत शरद शिरसाट यांनी व्यक्त केले.

## डेलनेटच्या उपक्रमात न्यू आर्ट्स महाविद्यालयाचा गौरव

### 'डेटा शेअरिंग अँड क्सेसिबिलिटी'मध्ये सक्रिय सहभाग; ग्रंथालयाला 'सर्टिफिकेट ऑफ प्रिसिएशन'

**● शेवगाव । वीरभूमी–**

नवी दिल्ली येथील डेलनेट (Developing Library Network) संस्थेच्या वतीने शेवगाव येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या ग्रंथालयाला 'सर्टिफिकेट ऑफ प्रिसिएशन' देऊन गौरविण्यात आले.



महाविद्यालयाच्या ग्रंथालयाने डेलनेटच्या माध्यमातून ग्रंथालयीन नोंदी उपलब्ध करून दिल्याबद्दल हा सन्मान प्रदान करण्यात आला. डेलनेटच्या 'बेस्ट प्रॅक्टिसेस - डेटा शेअरिंग अँड क्सेसिबिलिटी २०२६-२७' या उपक्रमात महाविद्यालयाच्या ग्रंथालयाने सक्रिय सहभाग नोंदविला.

या उपक्रमामुळे विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक तसेच शैक्षणिक क्षेत्रातील अभ्यासकांना ग्रंथालयातील विविध साधनसंपत्तीची माहिती ऑनलाइन उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. तसेच ग्रंथालयातील साहित्याची माहिती डिजिटल स्वरूपात व्यापक स्तरावर उपलब्ध करून देण्यासही या उपक्रमाचा उपयोग होणार आहे.

महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. भाऊसाहेब भिमाजी शेळके आणि संपूर्ण ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांनी केलेल्या योगदानाची दखल घेत डेलनेटच्या संचालक डॉ. संगीता कौल यांच्या स्वाक्षरीने हे प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात आले. या गौरवामुळे महाविद्यालयाच्या ग्रंथालयाच्या कार्याची शैक्षणिक क्षेत्रात दखल घेतली गेली आहे.

या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे यांचे मार्गदर्शन, तर उपप्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे व डॉ. युवराज सुडके यांचे सहकार्य लाभले. ग्रंथपाल डॉ. शेळके यांच्यासह सहाय्यक नंदकुमार बर्डे, आयोध्या देवकर, मयूर म्हस्के आणि निलेश कळकुंबे यांनी या उपक्रमासाठी योगदान दिले.

## पाथर्डी पोस्टाच्या कारभारावर नागरिक नाराज; शहरातच डाकघर सुरू करण्याची मागणी

### आधार कार्ड वितरणात दिरंगाई, चेकबुक चुकीच्या व्यक्तीकडे दिल्याची तक्रार; गैरसोयीच्या ठिकाणामुळे खातेदारांना मनस्ताप

**● पाथर्डी । वीरभूमी–**

शहरापासून सुमारे दीड किलोमीटर अंतरावर असलेल्या वामन भाऊनगर येथील पोस्ट ऑफिसच्या कारभाराबाबत नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. आधार कार्ड वितरणातील दिरंगाई, महत्त्वाची कागदपत्रे चुकीच्या व्यक्तीकडे दिल्याच्या तक्रारी आणि वितरण व्यवस्थेतील कथित अनियमितता यामुळे पोस्टाच्या विश्वासार्हतेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या नगरपालिकेच्या किंवा पंचायत समितीच्या जुन्या इमारतीत शहर डाकघर सुरू करावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

पाथर्डी शहराच्या मुख्य बाजारपेठेपासून पोस्ट ऑफिस दूर असल्याने व्यापारी, खातेदार आणि इतर नागरिकांना तेथे जाणे गैरसोयीचे ठरत आहे. त्यामुळे पोस्टात ठेवी ठेवण्याची इच्छा असूनही अनेक जण शहरातील बँका किंवा पतसंस्थांना प्राधान्य देतात, अशी नागरिकांची तक्रार आहे. रोख रक्कम घेऊन दूरच्या ठिकाणी जाणे जोखमीचे वाटत असल्याचेही व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. शहरात भर बाजारपेठेत दिवसाढवळ्या व्यापाऱ्यांना लुटण्याच्या घटना घडल्याने ही चिंता अधिक वाढली आहे.

नगरपालिकेची जुनी इमारत आणि पंचायत समितीची जुनी इमारत शहराच्या मध्यवर्ती भागात आहेत. या ठिकाणी डाकघर सुरू झाल्यास शहरातील नागरिकांना सहजपणे सेवा मिळू शकेल, असे मत व्यक्त केले जात आहे. विशेषतः महिला आणि मुलींना एकट्याने पोस्ट ऑफिसमध्ये जाण्यासाठी सुरक्षित व सोयीस्कर वातावरण उपलब्ध व्हावे, अशी अपेक्षाही नागरिकांनी व्यक्त केली आहे.

पोस्टाच्या वितरण व्यवस्थेतील कर्मचाऱ्यांकडून मनमानी पद्धतीने काम केले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. आधार कार्ड अनेक दिवस वितरणाविना पडून राहत असल्याने नागरिकांना वारंवार पोस्ट ऑफिसमध्ये हेलपाटे मारावे लागतात. सांस्कृतिक वार्तापत्रे, नियतकालिके आणि मासिकांच्या वितरणातही प्रभावीपणा नसल्याच्या तक्रारी आहेत.

सध्या दुष्काळी परिस्थिती असून, विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आधार कार्ड हे महत्त्वाचे कागदपत्र ठरते. अशा वेळी तयार होऊन आलेली आधार कार्डे वेळेत वितरित न झाल्यास गरजू नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागतो. आधार कार्डच्या पाकिटावर संबंधित व्यक्तीचा मोबाईल क्रमांक असतानाही 'मालक मिळून आला नाही' असा शेरा कसा दिला जातो, असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

खातेदाराची ओळख योग्य प्रकारे न पटवता त्याच्या नावाने आलेले चेकबुक अन्य व्यक्तीला दिल्याचा प्रकार नुकताच घडल्याची तक्रार करण्यात आली आहे. या प्रकरणामुळे पोस्टाच्या कामकाजाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. संबंधित महिला ग्राहकाने चेकबुक प्रकरणातील कर्मचाऱ्याने आपल्याशी अरेरावीची भाषा वापरल्याचा तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांशीही बेशिस्त वर्तन केल्याचा आरोप केला आहे.



शासनाकडून पोस्टाच्या विविध बचत योजना, ठेवी आणि आर्थिक व्यवहारांसाठी नागरिकांना प्रोत्साहित केले जाते. मात्र, कार्यालयाची गैरसोयीची जागा आणि वितरण व्यवस्थेबाबतच्या तक्रारींमुळे नागरिकांना अपेक्षित सेवा मिळत नसल्याची भावना व्यक्त होत आहे. पोस्टाच्या कारभारात सुधारणा कधी होणार, असा प्रश्न खातेदार उपस्थित करीत आहेत.

या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते प्रशांत सोनवणे, तक्रारदार रजनी गाडेकर आणि संजय सानप यांनी पोस्ट ऑफिसमध्ये जाऊन संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. नागरिकांच्या तक्रारी आणि घडलेल्या प्रकारांची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली जाईल. संबंधित कर्मचाऱ्यांकडून लेखी खुलासा मागविण्यात येईल आणि आगामी काळात कामकाजात सुधारणा केली जाईल, असे आश्वासन अधिकाऱ्यांकडून देण्यात आल्याचे सांगण्यात आले.

आता या तक्रारींची दखल घेऊन पोस्टाच्या कामकाजात सुधारणा केली जाते का आणि नागरिकांना शहरातच सोयीस्कर ठिकाणी डाकघर उपलब्ध होते का, याकडे पाथर्डीकरांचे लक्ष लागले आहे.

# गोदरेज कॅपिटलचा अहिल्यानगर, शिर्डीत गृहवित्त व्यवसाय विस्तार

### महाराष्ट्रातील परवडणाऱ्या गृहवित्त क्षेत्रातील स्थान अधिक मजबूत । टियर-२ शहरे व उदयोन्मुख सूक्ष्म बाजारपेठांवर भर

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

गोदरेज इंडस्ट्रीज समूहाची वित्तीय सेवा शाखा असलेल्या गोदरेज कॅपिटलने आपली उपकंपनी गोदरेज हाऊसिंग फायनान्सच्या माध्यमातून महाराष्ट्रातील परवडणाऱ्या गृहवित्त क्षेत्रातील आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. कंपनीने अहिल्यानगर आणि शिर्डी येथे आपल्या व्यवसायाचा विस्तार केला असून, याद्वारे राज्यातील टियर-२ शहरे आणि उदयोन्मुख निवासी सूक्ष्म बाजारपेठांवर लक्ष केंद्रित करण्याच्या आपल्या धोरणाला अधिक बळ दिले आहे. पुणे-नाशिक कॉरिडॉरमधील एक महत्त्वाचे विकासकेंद्र म्हणून अहिल्यानगरचा उदय होत आहे. या भागात प्रस्तावित असलेल्या २१३ किमी लांबीच्या द्रुतगती मार्गासह पायाभूत सुविधांच्या विकासामुळे प्रादेशिक दळणवळणात लक्षणीय सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. अधिक सुलभ संपर्कव्यवस्था आणि वाढत्या आर्थिक घडामोडींमुळे निवासी घरांची मागणी सातत्याने वाढत आहे. विशेषतः परवडणाऱ्या घरांच्या पर्यायांच्या शोधात असलेल्या प्रथमच घर खरेदी करणाऱ्यांमध्ये ही मागणी दिसून येते. दरम्यान, शिर्डीमध्येही स्थानिक अर्थव्यवस्थेची स्थिरता आणि वाढत्या निवासी प्रकल्प विकासामुळे घरांची मागणी चांगली राहिली आहे. शिर्डीत सातत्याने येणारे पर्यटक आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या आर्थिक घडामोडी यांमुळे हे शहर एक आश्वासक निवासी सूक्ष्म बाजारपेठ म्हणून उदयास येत आहे. यामुळे या भागातील परवडणाऱ्या गृहवित्ताची मागणी वाढण्यासही हातभार लागत आहे.

या विस्ताराबाबत भाष्य करताना गोदरेज हाऊसिंग फायनान्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मेहेरनोश टाटा म्हणाले, महाराष्ट्रातील शहरी तसेच उदयोन्मुख केंद्रांमध्ये घरांची असलेली मजबूत मागणी लक्षात घेता हे राज्य आमच्यासाठी प्राधान्याची बाजारपेठ आहे. टियर-२ शहरांमध्ये आणि सूक्ष्म बाजारपेठांमध्ये विस्तार करण्यामागील आमचा उद्देश प्रथमच घर खरेदी करणाऱ्या आणि स्वयंरोजगार असलेल्या ग्राहकांना घर खरेदी अधिक परवडणारी व्हावी आणि गृहवित्त सहज उपलब्ध व्हावे हा आहे. वितरण-केंद्रित दृष्टिकोन, तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कर्जजोखीम मूल्यांकन आणि ग्राहककेंद्रित उपाययोजनांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर जबाबदार आणि सर्वसमावेशक गृहवित्त सेवा उपलब्ध करून देण्याचे आमचे उद्दिष्ट आहे.

भारत सरकारच्या 'सर्वांसाठी घरे' या व्यापक संकल्पनेला पाठबळ देण्यासाठी गोदरेज कॅपिटल पगारदार आणि स्वयंरोजगार करणाऱ्या ग्राहकांसह प्रथमच घर खरेदी करणाऱ्यांसाठी लवचिक परतफेड कालावधीचे परवडणारे गृहकर्ज उपलब्ध करून देते. परिसंस्थेवर आधारित धोरणाचा भाग म्हणून, उदयोन्मुख सूक्ष्म बाजारपेठांपर्यंत पोहोचण्यासाठी कंपनी ४,००० हून अधिक स्थानिक संपर्क प्रतिनिधी, विकासक आणि वितरण भागीदारांसोबतचा सहयोग अधिक मजबूत करत आहे. त्याचबरोबर, चालू आर्थिक वर्षाच्या अखेरीस व्यवस्थापनांतर्गत मालमत्ता ११,८०० कोटी रु. पेक्षा अधिक करण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे. ऑगस्ट २०२६ अखेर, गोदरेज कॅपिटलची व्यवस्थापनाखालील एकूण मालमत्ता ३०,००० कोटी रु. पेक्षा अधिक होती. यामध्ये गोदरेज हाऊसिंग फायनान्सच्या एकूण कर्ज पोर्टफोलिओमध्ये महाराष्ट्राचा वाटा जवळपास ३०% आहे.

अहिल्यानगर आणि शिर्डी यांच्या जोडीला कंपनीने छत्रपती संभाजीनगर, अमळनेर, चाळीसगाव, जळगाव, लातूर, नागपूर, पुणे (खराडी), पंढरपूर, बदलापूर, सोलापूर आणि ठाणे यांसारख्या प्रमुख केंद्रांमध्येही आपली उपस्थिती वाढवली आहे. यावरून कंपनीच्या दीर्घकालीन विकास आराखड्यात महाराष्ट्राला असलेले धोरणात्मक महत्त्व अधोरेखित होते.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## आरोग्य भारतीतर्फे १२ मान्यवरांना धन्वंतरी पुरस्काराने गौरव

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

आरोग्य क्षेत्रात निःस्वार्थ रुग्णसेवा करणाऱ्या चार डॉक्टरांसह योग, सूर्यनमस्कार आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या १२ मान्यवरांना आरोग्य भारतीतर्फे धन्वंतरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कै. डॉ. केदारनाथ चांडक (सोनई) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ केडगाव येथील सरस्वती विद्यालयात हा पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला. आरोग्य भारतीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. सुरेश पाटणकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सुहास हिरेमठ उपस्थित होते. पुरस्कारार्थींमध्ये डॉ. प्रभाकर पवार, डॉ. श्रीवल्लभ घोरपडे, डॉ. श्रीकृष्ण जोशी, डॉ. विजयकुमार वऱ्हाडे, शांतीलाल चंदे आणि रमेश माधवस्वामी यांच्यासह अन्य मान्यवरांचा समावेश होता. प्रास्ताविकात डॉ. किशोर पुरकर यांनी आरोग्य भारतीच्या २४ वर्षांच्या सामाजिक व आरोग्यविषयक कार्याचा आढावा घेतला. अध्यक्षीय भाषणात डॉ. सुरेश पाटणकर यांनी व्यसनांपासून दूर राहणे, नियमित व्यायाम, प्राणायाम आणि योगाभ्यास यांचे महत्त्व अधोरेखित केले. प्रमुख पाहुणे सुहास हिरेमठ यांनी शरीर, बुद्धी आणि मनाचे आरोग्य जपण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात स्व. भानुदासजी कोतकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. डॉ. जयदीप देशमुख, प्राचार्य देसाई, संदीप भोर, दादाराम ढवान, रवींद्र चोभे, डॉ. अजित फुंदे, श्रीपाद शिंदीकर, राजेश परदेशी, कैलास चोथे, योगेश सेतवाल, डॉ. मैत्रेयी लिमये, डॉ. पौर्णिमा पुरकर, डॉ. मधुकर भोर, वैशाली चोथे, अयोध्या चांडक आणि प्रणव चांडक यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन डॉ. रेणुका जोशी यांनी केले. यावेळी शिक्षक व नागरिक उपस्थित होते.

## पाथर्डीत दुचाकी चोरांचा सुळसुळाट एका महिन्यात नऊ ते दहा दुचाकी गायब

**● पाथर्डी । वीरभूमी –**

शहर व परिसरात वाहनचोरांचा धुमाकूळ वाढला असून, आनंदनगर परिसरातील आरोग्यदीप हॉस्पिटलच्या पाठीमागे पार्क केलेल्या दोन दुचाकी एकाच वेळी अज्ञात चोरट्यांनी पळवल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार पत्रकार राजेंद्र देवढे (रा. पाथर्डी) यांनी १९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास आपली होंडा हॉर्नेट दुचाकी (क्र. एमएच १६ बीएस ३४१३) राहत्या इमारतीखालील पार्किंगमध्ये उभी केली होती. तसेच त्यांचे शेजारी आकाश नाडे यांनीही आपली होंडा शाईन (क्र. एमएच २८ बीएल ७७०८) त्याच ठिकाणी पार्क केली होती. १९ ऑक्टोबरच्या रात्री आठ ते २० ऑक्टोबरच्या सकाळी साडेसात वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी एकूण ६५ हजार रुपये किमतीच्या या दोन्ही दुचाकी चोरून नेल्या. सकाळी आकाश नाडे गाडी शोधत असताना चोरीचा प्रकार समोर आला. परिसरात शोध घेऊनही गाड्यांचा सुगावा लागला नाही. या प्रकरणी राजेंद्र देवढे यांच्या फिर्यादीवरून पाथर्डी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, चोरीच्या वाढत्या घटना व चोरीच्या घटनाचा तपास लागत नसल्याने पोलीसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पाथर्डी पोलीस परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास करत आहेत.

## परीक्षेदरम्यान शाळेत अनधिकृत प्रवेशाचा प्रयत्न? निलंबित मुख्याध्यापकांविरोधात पोलिसांत तक्रार

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

अहिल्यानगर येथील ए.टी.यू. चाँद सुलताना हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे निलंबित मुख्याध्यापक शेख मोहम्मद समी इमाम साहब यांच्याविरोधात परीक्षा सुरू असताना शाळेत अनधिकृत प्रवेश करून गोंधळ घालण्याचा तसेच प्रशासकीय कामकाजात अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी अंजुमन तरक्की-ए-उर्दू ट्रस्टचे चेअरमन शेख मुशाहिद लियाकत यांनी संबंधित पोलीस प्रशासनाकडे तक्रार अर्ज दाखल करून आवश्यक ती कारवाई करण्याची मागणी केली आहे. तक्रार अर्जात नमूद केल्यानुसार, संबंधित मुख्याध्यापकांना संस्थेने १४ ऑगस्ट २०२६ पासून निलंबित केले आहे. त्यांच्याविरोधात सेवा शर्तींचा भंग, बनावट जाहिरात व कागदपत्रे तयार करणे, शासनाची फसवणूक आणि आर्थिक अनियमितता यांसारखे आरोप करण्यात आले असून, या प्रकरणांची चौकशी सुरू असल्याचे तक्रारदारांनी म्हटले आहे. दरम्यान, जिल्हा परिषद अहिल्यानगरचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी २२ ऑक्टोबर २०२६ रोजी दिलेल्या पत्राचा चुकीचा अर्थ लावून संबंधित निलंबित मुख्याध्यापक शाळेत प्रवेश करण्याचा प्रयत्न करीत असल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. या पत्रामध्ये संबंधितांना पुन्हा सेवेत रुजू करून घेण्याबाबत कोणताही स्पष्ट आदेश नसल्याचेही तक्रार अर्जात नमूद करण्यात आले आहे. संस्थेने दिलेल्या निलंबन आदेशाला कोणत्याही न्यायालयाने अथवा स्कूल ट्रिब्युनलने स्थगिती दिलेली नसल्याचा दावाही तक्रारदारांनी केला आहे. सध्या शाळेत परीक्षा सुरू असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताला बाधा पोहोचू नये, तसेच परीक्षा प्रक्रियेत कोणताही व्यत्यय येऊ नये, यासाठी शाळेतील शांतता व सुव्यवस्था कायम राखणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरला रेडियम, रिफ्लेक्टर बंधनकारक!

**अपघात रोखण्यासाठी श्रीगोंदा पोलिसांचे साखर कारखान्यांना निर्देश । नियमभंग करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा**

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर-ट्रॉलींना रेडियम आणि रिफ्लेक्टर बसविणे, तसेच वाहतुकीचे नियम पाळणे बंधनकारक करण्यात आले आहे. ऊस वाहतुकीदरम्यान होणारे अपघात आणि मनुष्यहानी टाळण्यासाठी श्रीगोंदा पोलिसांनी तालुक्यातील साखर कारखान्यांच्या व्यवस्थापनाला तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत.



साखर कारखान्यांचा गाळप हंगाम सुरू झाल्याने श्रीगोंदा, दौंड आणि कर्जत तालुक्यांतून मोठ्या प्रमाणावर ट्रॅक्टरद्वारे ऊस वाहतूक केली जात आहे. जामखेड-न्हावरा आणि दौंड-अहिल्यानगर या प्रमुख मार्गांवर वाहनांची मोठी वर्दळ असते. अशा परिस्थितीत ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर-ट्रॉलींना रेडियम व रिफ्लेक्टर नसणे, तसेच वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करणे अपघातांना निमंत्रण देणारे ठरत आहे. यापूर्वीही अशा वाहनांमुळे गंभीर अपघात होऊन मनुष्यहानी झाल्याच्या घटना घडल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर श्रीगोंदा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांनी साखर कारखान्यांच्या व्यवस्थापकांना पत्र पाठवून आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरचालक आणि मालकांची तातडीने बैठक घेऊन त्यांना वाहतुकीच्या नियमांची जाणीव करून द्यावी. परिवहन विभागाच्या नियमांनुसार ट्रॅक्टर आणि ट्रॉलीच्या मागील बाजूस रेडियम व रिफ्लेक्टर बसविण्याची कार्यवाही करावी. तसेच ट्रॅक्टरमध्ये गाणी वाजविण्यासाठी टेप लावू नये, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत.

अपघातमुक्त ऊस वाहतुकीसाठी साखर कारखान्यांनी स्वतःच्या स्तरावर तातडीने मोहीम राबवून केलेल्या उपाययोजनांची माहिती पोलीस प्रशासनाला द्यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन झाल्यास किंवा निष्काळजीपणामुळे अनुचित घटना घडल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांनी दिला आहे.

## खांडगावच्या कोंगजाई डोंगरावर कोजागरीचा जागर!

**हजारो भाविकांची दर्शनासाठी गर्दी । प्राचीन वारशाच्या संवर्धनातून पर्यटन विकासाची अपेक्षा**



**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्रीगोंदा तालुक्यातील खांडगाव येथील उंच डोंगरावरील जागृत देवस्थान कोंगजाई देवीच्या मंदिरात कोजागरी पौर्णिमा उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. नवसाला पावणारी देवी म्हणून प्रसिद्ध असलेल्या या देवस्थानात हजारो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

घटस्थापनेपासून कोजागरी पौर्णिमेपर्यंत पंधरा दिवस देवीची आराधना केली जाते. दसऱ्याला पाच किलोमीटर अंतरावरून देवीची पालखी गावात आणली जाते. कोजागरी पौर्णिमेला नवसपूर्ती, देवीचा गोंधळ, होम आणि रात्रभर जागर असे धार्मिक कार्यक्रम पार पडले. संतोष शिंदे व भाऊसाहेब शिंदे बंधूंच्या संबळ वादनाने वातावरण भक्तिमय झाले होते. मंदिराला फुलांची सजावट आणि विद्युत रोषणाई करण्यात आली होती. दुष्काळी परिस्थितीमुळे यंदा यात्रा साधेपणाने साजरी करण्यात आली. कोंगजाई देवी यात्रा कमिटीच्या वतीने नियोजन करण्यात आले होते.

परिक्रमा इन्स्टिट्यूटच्या अध्यक्षा प्रतिभाताई पाचपुते यांनी भाविकांना शुभेच्छा देत देवीला चोळी अर्पण केली. वनविभागाच्या माध्यमातून डोंगर परिसरात पर्यटनाच्या दृष्टीने विकासकामे सुरू असून, ग्रामस्थांनी एकत्रितपणे प्रयत्न करून ही कामे पूर्णत्वास न्यावीत, असे आवाहन त्यांनी केले.

कोंगजाई डोंगर परिसरात तीन पाण्याची टाकी आणि प्राचीन गुहा असून, हा परिसर सातवाहन काळातील वारसा असल्याचे वारसा अभ्यासक तथा शिवदुर्ग ट्रेकर्स फाउंडेशनचे राजेश इंगळे यांनी सांगितले. पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली या ऐतिहासिक ठेव्याचे शास्त्रीय पद्धतीने संवर्धन करावे. भविष्यात हा परिसर सुंदर पर्यटनस्थळ म्हणून विकसित होऊ शकतो, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

या यात्रेसाठी सरपंच, उपसरपंच, सोसायटीचे चेअरमन, ज्येष्ठ नागरिक, बाळासाहेब महाडिक, भगवान ढवळे, दिलीप शिंदे, संतोष भगत, सचिन ढवळे, बाबासाहेब जाधव, जालिंदर टकले आणि तरुण मंडळाने विशेष योगदान दिले.

## हिंदुत्वाबद्दल नकारात्मक चर्चा करणे चुकीचे : डॉ. गुगळे

**पाथर्डीत आरएसएसचा विजयादशमी उत्सव**

**● पाथर्डी । वीरभूमी –**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारसरणीचे महत्त्व समाजातील विविध घटकांना पटू लागले आहे. हिंदुत्वाबद्दल नकारात्मक चर्चा करणे चुकीचे असून, ज्या संस्कृतीने संपूर्ण जगाला दिशा दिली, त्या संस्कृतीचा स्वीकार करूनच पुढे जावे लागेल, असे मत ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ व विचारवंत डॉ. ललित गुगळे यांनी व्यक्त केले.



विजयादशमी उत्सवानिमित्त पाथर्डी शहरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांनी सघोष संचलन केले. त्यानंतर आप्पासाहेब राजळे मंगल कार्यालयात मुख्य उत्सव पार पडला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून पश्चिम महाराष्ट्र प्रांत शारीरिक मंडळाचे सदस्य दिगंबर देवरकोंडा, तसेच तालुका संघचालक अरविंद पारगावकर उपस्थित होते. कार्यक्रमाला संघाचे स्वयंसेवक, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात सामाजिक समरसता, पर्यावरण संवर्धन, नागरिक कर्तव्य, कुटुंब प्रबोधन आणि स्वबोध या पंचपरिवर्तनाच्या सूत्रांवर आधारित मार्गदर्शन करण्यात आले. दिगंबर देवरकोंडा यांनी तालुका शाखेच्या गुणात्मक वाढीचे कौतुक केले. तसेच संघाने सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्याचा आढावा घेत जिल्ह्यातील विविध घटनांचे संदर्भ दिले.

डॉ. ललित गुगळे म्हणाले की, नैसर्गिक आपत्तीच्या काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने केलेले सेवा कार्य अनेकदा प्रशंसनीय ठरले आहे. भारताचा प्राचीन इतिहास आणि सांस्कृतिक परंपरा मोठी आहे. विविध धर्मांच्या आगमनानंतरही हिंदू धर्माची परंपरा टिकून राहिली आहे.

भारतामध्ये विविध जाती आणि भाषा असूनही विविधतेत एकता हे देशाचे वैशिष्ट्य आहे. आपण सर्वजण या भूमीची लेकरे आहोत, ही बंधुत्वाची भावना आपली सामाजिक शक्ती आहे. स्वतःच्या संस्कृतीबद्दलचा अभिमान कमी झाल्यामुळे समाजाचे नुकसान झाले, असे मत त्यांनी व्यक्त केले.

मुघल आणि ब्रिटिशांच्या काळात भारतीय संस्कृती व धर्मावर आघात झाले. मात्र, आज भारतीय संस्कृतीकडे जग सकारात्मक दृष्टीने पाहत आहे. आपली भाषा, संस्कृती आणि धर्म यांचा जगात आदर केला जातो. माध्यमांमधून भारतीय जीवनपद्धतीचे विकृतीकरण होत असल्याची टीका करत, भारतीयत्वाचा अभिमान जपत परस्परांविषयी आदरभाव ठेवून पुढे जाण्याची गरज असल्याचेही डॉ. गुगळे यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शैलेश शिरसाठ यांनी केले. नानासाहेब पालवे यांनी पद्य सादर केले. डॉ. सुनील फुंदे आणि विशाल दानापुरे यांनी अमृतवचने सांगितली. गणेश पाथरकर यांनी आभार मानले.

## रेसिडेन्शिअल हायस्कूलच्या विद्यार्थ्यांकडून स्नेहालयातील मुलांना वस्तुरूपात मदत

**१९ बॉक्समधून २ हजार उपयोगी वस्तूंचे वाटप । सामाजिक बांधिलकीचे दर्शन**

**● शेवगाव । वीरभूमी–**

सामाजिक बांधिलकीची जाणीव जपत शेवगाव येथील रेसिडेन्शिअल हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी अहिल्यानगर येथील स्नेहालयातील अनाथ व गरजू मुलांना विविध उपयोगी वस्तूंची मदत केली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी सामाजिक संवेदनशीलता, सहकार्य आणि माणुसकीचे दर्शन घडविले.

विद्यार्थ्यांनी टूथपेस्ट, टूथब्रश, साबण, तेल, उटणे, नेलकटर आदी दैनंदिन वापरातील सुमारे दोन हजार उपयोगी वस्तू १९ बॉक्समधून स्नेहालयाला दिल्या. विद्यालयाचे प्राचार्य बालाजी गायकवाड यांच्या हस्ते या वस्तू स्नेहालय संस्थेच्या अध्यक्षा जयाताई जोगदंड यांच्याकडे सुपूर्द करण्यात आल्या.

लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक सेवेची भावना रुजावी, गरजू व्यक्तींबद्दल आपुलकी निर्माण व्हावी आणि समाजाप्रती असलेल्या आपल्या जबाबदारीची जाणीव व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. स्नेहालय संस्थेच्या अध्यक्षा जयाताई जोगदंड यांनी विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करून आभार मानले.

शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम प्राचार्य बालाजी गायकवाड आणि ज्येष्ठ शिक्षक चंद्रकांत अमृते यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. शिक्षणासोबत सामाजिक मूल्यांची जपणूक करणेही महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी केलेल्या या उपक्रमातून दातृत्व, सहकार्य आणि माणुसकीचा संदेश समाजापर्यंत पोहोचला.



यावेळी स्नेहालय संस्थेच्या अध्यक्षा जयाताई जोगदंड, युवा निर्माण प्रकल्पाचे प्रमुख विकास सुतार, उडान प्रकल्प टीमचे सदस्य तुषार केदारी, शेवगावचे क्षेत्रीय अधिकारी अंबादास शिंदे, उचल फाउंडेशनच्या प्रमुख सुजाता खेडकर, डॉ. संजय लड्डा, विद्यालयाचे प्राचार्य बालाजी गायकवाड, पर्यवेक्षक महेश शिंदे, ज्येष्ठ शिक्षक चंद्रकांत अमृते, सुनील गोर्डे, अमोल पवार, प्रमोद कानडे, शिवगंगा कांजवणे, स्वाती ढोले, स्वाती गायकवाड, माधुरी देशमुख आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक रामनाथ काळे यांनी केले, तर शिक्षक नवनाथ आगळे यांनी आभार मानले.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील संत-कीर्तनकारांकडून गोदावरी परिक्रमेचा प्रारंभ

**प्रवरासंगम येथे संकल्प व गंगापूजन । ४० साधकांचा सहभाग, त्र्यंबकेश्वर ते गोदावरी संगमापर्यंत भक्तिमय परिक्रमा**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रमुख कीर्तनकार, संत आणि साधक मंडळींनी दक्षिण गंगा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री गोदावरी मातेच्या पवित्र परिक्रमेला सुरुवात केली आहे. प्रवरासंगम येथील ऐतिहासिक सिद्धेश्वर मंदिर परिसरात गंगापूजन व संकल्प करून शनिवार, २५ ऑक्टोबर रोजी भक्तिमय वातावरणात या परिक्रमेचा प्रारंभ झाला. जिल्ह्यातील वारकरी आणि संत परंपरेतील सुमारे ४० साधक या परिक्रमेत सहभागी झाले आहेत.

मागील वर्षी उत्तर भारतातील राजेंद्र दासजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली सुमारे ४०० ते ५०० साधूंनी गोदावरी परिक्रमा पूर्ण केली होती. त्याच धर्तीवर अहिल्यानगर जिल्ह्यातील संत व साधकांनी हा पवित्र संकल्प हाती घेतला आहे.

गंगापूजनानंतर परिक्रमावासींनी श्रीक्षेत्र देवगड आणि श्रीक्षेत्र नेवासा येथील मंदिरांत जाऊन दर्शन घेतले. त्यानंतर त्र्यंबकेश्वर येथे ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा करून गोदावरीचा उगम न ओलांडता उत्तर तटाने पुढील प्रवास सुरू केला.

सुमारे १५ ते २० दिवसांच्या या भक्तिमय यात्रेसाठी देवगड संस्थानचे महंत भास्करगिरीजी महाराज, स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज तसेच श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर, नेवासा येथील महंत देविदास महाराज म्हस्के यांनी सर्व साधकांना सदिच्छा देत आशीर्वाद दिला.



या परिक्रमेत जिल्ह्यातील प्रमुख संत आणि कीर्तनकार सहभागी झाले आहेत. यामध्ये ब्रह्मानंद स्वामी महाराज, भगवान महाराज जंगले शास्त्री, हरि महाराज वाकचौरे, सेवानाथ महाराज, सुदाम महाराज आदमने, राजेंद्र महाराज आसणे, रितेश महाराज देशमुख, गहिनीनाथ महाराज आढाव, चांगदेव महाराज काळे, गणेश महाराज आरगडे, हरी महाराज भोगे, रामेश्वर महाराज कंठाळे, विनोद महाराज तपसे, अभेदानंद महाराज बीड, भगवान महाराज चोळके शास्त्री, नंदकिशोर महाराज खरात, विशाल महाराज गिरमे, ऋषिकेश महाराज वाकचौरे, बाळकृष्ण महाराज दिघे, अशोक महाराज बोरुडे, राम महाराज चोपडे, अवधूतपुरी महाराज, संदीप महाराज बाजाठाण, ज्ञानेश्वर महाराज भिसे, उद्धव महाराज गोरे, राजाराम बाबा, पांडुरंग महाराज पवार, अर्जुन महाराज तनपुरे, जगदीश दळे आदींचा समावेश आहे.

परिक्रमेदरम्यान दररोज पहाटे गोदावरी स्नान, आरती, काकडा भजन, अखंड नामजप, भजन, हरिपाठ, कीर्तन तसेच सायंकाळी आरतीचे आयोजन करण्यात येत आहे. पूजनीय ब्रह्मानंद स्वामी महाराज यांचे दररोज प्रवचनही होत असून, या माध्यमातून सत्संगाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गोदावरी नदीची त्र्यंबकेश्वर ते संगमापर्यंतची परिक्रमा धार्मिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण मानली जाते. या परिक्रमेच्या माध्यमातून अध्यात्माबरोबरच नदी स्वच्छता, जलसंवर्धन आणि संस्कृती जतनाचा संदेश जनमानसापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न होत आहे.

ही परिक्रमा नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर-ब्रह्मगिरी येथून उत्तर तटाने पुढे तेलंगणा आणि आंध्र प्रदेशात प्रवेश करणार आहे. राजमहेंद्रीजवळ गोदावरी नदी बंगालच्या उपसागराला मिळते त्या अंतर्वेदी/नरसापूर संगम क्षेत्रापर्यंत प्रवास केल्यानंतर परिक्रमावासी दक्षिण तटाने परतीचा प्रवास करतील. त्यानंतर अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रवरासंगम येथे या परिक्रमेची सांगता होणार आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील संत आणि कीर्तनकारांनी सुरू केलेल्या या उपक्रमामुळे भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, भविष्यात मोठ्या संख्येने भाविक या परिक्रमेत सहभागी होतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### पैठणमध्ये परिक्रमावासीयांचे स्वागत

■ परिक्रमावासी श्रीक्षेत्र पैठण येथे गेले असता संत एकनाथ महाराज संस्थान आणि महाराज मंडळींच्या वतीने त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. गीता मंदिराचे अध्यक्ष विष्णू महाराज जगताप, बद्रीनाथ महाराज नवल, संतोष महाराज ठेनगे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या परिक्रमेचा आदर्श घेऊन लवकरच गोदावरी परिक्रमा करण्याचा संकल्प व्यक्त केला. नांदेड जिल्ह्यातील मुदखेड तालुक्यातील साध्वी मुक्तीनाथ आईसाहेब यांनीही शेकडो अनुयायांसह गोदावरी परिक्रमा करण्याचा संकल्प केला आहे. परिक्रमेच्या मार्गावर ठिकठिकाणी परिक्रमावासीयांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात येत आहे.

# कर्मचाऱ्यांच्या योगदानातूनच संस्थेची खरी ताकद

## हास्य अभिनेते पंढरीनाथ कांबळे । श्री रेणुकामाता मल्टिस्टेटचा वार्षिक गुणगौरव सोहळा उत्साहात; अधिकारी-कर्मचाऱ्यांना ६१ लाखांची रोख पारितोषिके

**● शेवगाव । वीरभूमी-**

**एखाद्या संस्थेची खरी ताकद केवळ तिच्या इमारतीत किंवा आर्थिक व्यवहारांत नसते, तर त्या संस्थेसाठी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या सेवकांमध्ये असते. कर्मचाऱ्यांच्या मेहनतीची योग्य वेळी दखल घेतली गेली, तर त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि काम करण्याची नवी ऊर्जा मिळते. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. प्रशांत भालेराव यांच्या नेतृत्वाखाली श्री रेणुकामाता मल्टिस्टेट संस्थेने घेतलेली भरारी तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांचे योगदान अत्यंत स्पृहणीय आहे, असे प्रतिपादन हास्यअभिनेते पंढरीनाथ कांबळे तथा पॅडी यांनी केले.**



नेवासा फाटा येथील श्री रेणुकामाता रेस्टॉरंट अँड रिसॉर्टमधील भव्य मंगल कार्यालयात श्री रेणुकामाता मल्टिस्टेट को-ऑप अर्बन क्रेडिट सोसायटी लिमिटेडच्या अधिकारी, कर्मचारी व शाखांचा वार्षिक गुणगौरव सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी हास्य अभिनेते पंढरीनाथ कांबळे उर्फ पॅडी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तारकेश्वर देवस्थानचे महंत शांतीब्रम्ह आदिनाथ महाराज शास्त्री हे होते.

आर्थिक क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या श्री रेणुकामाता मल्टिस्टेट संस्थेच्या देशातील नऊ राज्यांत १५२ शाखा असून, संस्थेची उलाढाल १० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. उद्दिष्टपूर्ती करून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी तसेच शाखांचा या सोहळ्यात गौरव करण्यात आला. पाहुण्यांच्या हस्ते अधिकारी व कर्मचाऱ्यांना तब्बल ६१ लाख रुपयांची रोख पारितोषिके आणि स्मृतिचिन्हे देऊन सन्मानित करण्यात आले. वार्षिक कामगिरीच्या आधारे उत्कृष्ट शाखा पुरस्कारांचेही वितरण करण्यात आले.

पाथर्डी शाखेने सलग पाचव्या वर्षी प्रथम क्रमांक पटकावत तीन लाख एक हजार रुपयांचे पारितोषिक मिळविले. शेवगाव शाखेने द्वितीय क्रमांक मिळवत दोन लाख एक हजार रुपये, तर अमरापूर शाखेने तृतीय क्रमांक मिळवत एक लाख ५१ हजार रुपयांचे रोख पारितोषिक व स्मृतिचिन्ह पटकावले.

उत्तेजनार्थ पुरस्कारांमध्ये संगमनेर शाखेला ९१ हजार रुपये, पंढरपूर शाखेला ७१ हजार रुपये, तर शिरोळ शाखेला ५१ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. संस्थेच्या विविध विभागांत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी तसेच रेणुकामाता परिवारातील गुणवंत पाल्यांचाही रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. प्रशांत भालेराव यांनी संस्थेची प्रगती केवळ आर्थिक आकडेवारीपुरती मर्यादित नसून ग्राहकांचा विश्वास, कर्मचाऱ्यांमधील समन्वय, कामातील पारदर्शकता आणि सेवाभाव यांवर संस्थेचे यश अवलंबून असल्याचे सांगितले.

प्रत्येक शाखेने आपली कामगिरी उंचावण्याचे उद्दिष्ट ठेवावे. शाखाधिकाऱ्यांनी सहकाऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांच्यात काम करण्याची प्रेरणा निर्माण करावी. एकट्याच्या प्रयत्नांपेक्षा सांघिक प्रयत्नांतून मोठे यश मिळते. त्यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्याने संस्थेला स्वतःची संस्था समजून काम करावे आणि पुढील वर्षी अधिकाधिक पारितोषिके मिळविण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन त्यांनी केले. पुढील रौप्य महोत्सवी गुणगौरव सोहळा दारेसलाम येथील संस्थेच्या भव्य कार्यालयात घेण्याचे नियोजन असल्याचे डॉ. भालेराव यांनी सांगितले. यावेळी उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले.

यावेळी माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, नगरचे माजी महापौर भाऊसाहेब फुलसौंदर, पाथर्डीचे माजी नगराध्यक्ष सुभाष घोडके, माजी प्राचार्य चंद्रकांत गळगट्टे, जिल्हा दूध संघाचे माजी अध्यक्ष नारायण बापू धस, शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख रामदास गोल्हार, अ‍ॅड. नितीन भालेराव, डॉ. अरविंद पोटफोडे, श्रीमंत घुले, प्रा. जनार्दन लांडे पाटील, अनिल साठे, भिवाजी आघाव, प्रा. उपेंद्र गळगट्टे, रेणुका भक्तानुरागी मंगल भालेराव, जयंती भालेराव, मनीषा भालेराव, प्रज्ञेश भालेराव, गौरी भालेराव, रुद्रांश भालेराव व देवांश भालेराव आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशासकीय अधिकारी कार्तिक पुनगंटीवार, मुख्य कार्यकारी अधिकारी हरिश्चंद्र मोरे, जनरल मॅनेजर दिनेश टकले, पोपट काळे, सीनियर मॅनेजर अतुल इथापे, सरव्यवस्थापक राजेंद्र नांगरे आणि अश्वलिंग जगनाडे यांनी नियोजन केले.

प्रास्ताविक ज्येष्ठ पत्रकार अनिरुद्ध देवचटके यांनी केले. सूत्रसंचालन वीणा दिघे यांनी केले, तर गणेश शेंडगे यांनी आभार मानले.

> माझा विश्वास आणि श्रद्धा फक्त दोन जणांवर आहे. एक परमेश्वर आणि दुसरे दैविक अंश असणारे ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. प्रशांतनाना भालेराव यांचेवर आहे. त्यांच्यावरील विश्वासावर श्रीरेणुकामाता मल्टीस्टेटने लाखो खातेदारांना चांगली सेवा देवून उंच भरारी घेतली आहे. त्या विश्वासावरच रेणुकामातेमधील गुंतवणूक ही वृद्धिंगतच होत राहणार, हा आमचा स्वतःचा अनुभव आहे.
>
> **- शांतीब्रह्म आदिनाथ महाराज शास्त्री,** महंत, श्रीक्षेत्र तारकेश्वर गड

## कासलीचा १३ मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्प लवकरच कार्यान्वित होणार

### आ. विवेक कोल्हे यांच्या पाठपुराव्यास यश ४० एकर क्षेत्रात सौर प्रकल्पाची उभारणी

**● कोपरगाव । वीरभूमी -**

तालुक्यातील कासली येथे ४० एकर क्षेत्रात उभारण्यात आलेला १३ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प लवकरच कार्यान्वित होणार आहे. या प्रकल्पाच्या फिडरसंदर्भातील अडचणी दूर करून तो लवकर सुरू करण्यासाठी आ. विवेक कोल्हे यांच्या माध्यमातून महावितरण विभागाकडे पत्रव्यवहार करण्यात आला होता. या पाठपुराव्यामुळे प्रकल्पाच्या कामाला गती मिळाली असून, उभारणीचे काम आता अंतिम टप्प्यात आले असून लवकरच या प्रकल्पाचे लोकार्पण केले जाणार आहे.

या सौर ऊर्जा प्रकल्पातून ११ केव्ही वीजवाहिनीद्वारे ३३/११ केव्ही दहेगाव बोलका उपकेंद्राला सौर वीज उपलब्ध होणार आहे. या प्रकल्पामुळे दहेगाव बोलका उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या दहेगाव, कासली, लौकी, गोधेगाव, घोयेगाव, आपेगाव, तिळवणी, शिरसगाव, सवळगाव आणि उक्कडगाव या दहा गावांतील वीजग्राहकांना लाभ होणार आहे. या गावांमधील पाच कृषी फिडरद्वारे शेतीपंपांना वीजपुरवठा केला जातो.या परिसरात एकूण ४ हजार ३८२ वीजग्राहक आहेत. यामध्ये २ हजार २०० कृषी पंप वीजग्राहक, २ हजार ३० घरगुती वीजग्राहक, ८९ व्यावसायिक वीजग्राहक, ३५ औद्योगिक वीजग्राहक आणि २८ इतर वीजग्राहकांचा समावेश आहे. त्यामुळे या प्रकल्पाचे कार्यान्वयन परिसरातील कृषी वीजग्राहकांसह घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीजग्राहकांच्या दृष्टीनेही महत्त्वाचे ठरणार आहे.

सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर कृषी फिडरवरील वीजपुरवठ्याचे नियोजन अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे. तसेच शेतीपंपांना दिवसा वीजपुरवठा उपलब्ध होण्यास हातभार लागणार असल्याने शेतकऱ्यांना पिकांच्या सिंचनाचे नियोजन करणे सोयीचे होणार आहे. शेतीसाठी आवश्यक असलेल्या वीजपुरवठ्याच्या नियोजनाच्या दृष्टीने या प्रकल्पाला विशेष महत्त्व आहे.

कासली येथील सौर ऊर्जा प्रकल्पाच्या फिडरसंदर्भातील अडचणी दूर करून प्रकल्प लवकर कार्यान्वित व्हावा, यासाठी आ. विवेक कोल्हे यांनी महावितरण विभागाकडे पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला. या पाठपुराव्यामुळे प्रकल्पाच्या कामाला गती मिळाली असून, लवकरच प्रकल्प कार्यान्वित होणार आहे. याबद्दल परिसरातील शेतकऱ्यांनी आ. विवेक कोल्हे यांचे आभार मानले आहेत.

### आ. विवेक कोल्हेंच्या सुचनेनंतर कार्यवाही



■ उक्कडगाव ए.जी. फीडर क्र. ६२ वरील अतिरिक्त विद्युत भार कमी करण्यासाठी नवीन १० कि.मी. लांबीची ११ के. व्ही. वीजवाहिनी उभारणे. RDDS योजनेअंतर्गत नवीन वीजवाहिनी मंजूर करून स्वतंत्र फीडर सेपरेटर बसविणे. सध्या फीडरवर सिंगल फेज व थ्री फेज वीजपुरवठ्यावर अतिरिक्त भार पडत असल्याने वारंवार ओव्हरलोडिंगची समस्या निर्माण होत आहे.त्यामुळे कमी दाबाने वीजपुरवठा होण्याची समस्या दूर करून शेतकरी व ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा उपलब्ध करून देणे यावर देखील आ.विवेकभैय्या कोल्हे यांच्या सूचनेनंतर कार्यवाही सुरू झालेली आहे.

## महात्मा फुले विद्यालय रिंगटेनिस स्पर्धेत जिल्ह्यात द्वितीय

### १७ वर्षांखालील मुलींच्या संघाची चमकदार कामगिरी । जिल्हास्तरीय स्पर्धेत उपविजेतेपद

**● अकोले । वीरभूमी-**



श्री अगस्ती एज्युकेशन सोसायटी संचलित महात्मा फुले विद्यालयाच्या १७ वर्षांखालील मुलींच्या संघाने जिल्हास्तरीय टेनिक्काईट्स (रिंगटेनिस) स्पर्धेत चिवट झुंज देत द्वितीय क्रमांक पटकावला. या कामगिरीमुळे विद्यालयाच्या संघाला उपविजेतेपद मिळाले असून, शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशस्वी परंपरेत आणखी एका मानाचा तुरा रोवला गेला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे आणि जिल्हा क्रीडा कार्यालय, अहिल्यानगर यांच्या वतीने जिल्हास्तरीय रिंगटेनिस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा नुकतीच संगमनेर येथील श्रमिक कनिष्ठ महाविद्यालयात पार पडली. या स्पर्धेत महात्मा फुले विद्यालयाच्या १४ व १७ वर्षांखालील मुलींच्या संघांनी सहभाग नोंदवला. दोन्ही गटांतील खेळाडूंनी चुरशीच्या सामन्यांत आपल्या खेळाचे कौशल्य दाखवले. त्यात १७ वर्षांखालील मुलींच्या संघाने विशेष कामगिरी करत उपविजेतेपद मिळवले.

या संघात वैष्णवी देशमुख, अवंतिका देशमुख, खुशी आवारी, प्रांजल देशमुख, विद्या देशमुख आणि कार्तिकी देशमुख या खेळाडूंचा समावेश होता.

विद्यालयाने यापूर्वीही विविध क्रीडा प्रकारांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या यशाबद्दल संस्थेच्या सचिव शैलजा पोखरकर, कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी, सतीश नाईकवाडी, संदीप नाईकवाडी, मुख्याध्यापक तात्यासाहेब दौंड, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी तसेच सुगाव बुद्रुक, मनोहरपूर आणि वाशेरे येथील ग्रामस्थांनी यशस्वी खेळाडू व क्रीडाशिक्षक दत्तात्रय घुले यांचे अभिनंदन केले.

## ढाकणे शैक्षणिक संकुलाचे भविष्यात विद्यापीठात रूपांतर होईल

### डॉ. संदीप पालवे । एमबीए पदवी प्रदान सोहळ्यात ४८ विद्यार्थ्यांना पदवी

**● शेवगाव । वीरभूमी-**



ढाकणे शैक्षणिक संकुलाची शैक्षणिक क्षेत्रातील प्रगती आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याचे कार्य कौतुकास्पद आहे. संस्थेची ही वाटचाल पाहता येत्या काही वर्षांत या संस्थेचे विद्यापीठात रूपांतर झालेले पाहायला मिळेल, असा विश्वास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अधिसभा सदस्य डॉ. संदीप पालवे यांनी व्यक्त केला.

केदारेश्वर ग्रामीण विकास प्रतिष्ठान, संगमनेर संचलित सुनीताताई एकनाथराव ढाकणे कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, ढाकणे शैक्षणिक संकुल, राक्षी, ता. शेवगाव येथे आयोजित एमबीए पदवी प्रदान सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पालवे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एकनाथराव ढाकणे होते.

यावेळी जागतिक आरोग्य सल्लागार डॉ. तुकाराम नेहरकर, संस्थेचे उपाध्यक्ष श्रीकांत ढाकणे, कोषाध्यक्ष हृषीकेश ढाकणे, महाविद्यालयाचे संचालक डॉ. आर. एच. अत्तार आदी उपस्थित होते.

डॉ. संदीप पालवे म्हणाले, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार संस्थेमध्ये सुरू असलेले विविध शैक्षणिक उपक्रम कौतुकास्पद आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व्यवस्थापन शिक्षण मिळावे, यासाठी संस्थेने केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एकनाथराव ढाकणे यांनी विद्यार्थ्यांना प्रतिकूल परिस्थितीकडे संधी म्हणून पाहण्याचे आवाहन केले. जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर विद्यार्थ्यांनी यश संपादन करावे. ध्येय निश्चित करून सातत्याने प्रयत्न केल्यास यश निश्चित मिळते, असे त्यांनी सांगितले. डॉ. तुकाराम नेहरकर यांनीही यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

ग्रामीण भागात २०२४ मध्ये सुरू झालेल्या या व्यवस्थापन महाविद्यालयातील ४८ विद्यार्थ्यांना यावेळी एमबीए पदवी प्रदान करण्यात आली. महाविद्यालयाने १०० टक्के निकालाची उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. योगेश्वर शिरसाट, प्रा. भक्ती पंचरिया आणि प्रा. जगदीश दळे यांनी विशेष प्रयत्न केले. महाविद्यालयाचे संचालक डॉ. आर. एच. अत्तार यांनी महाविद्यालयाच्या वर्षभरातील शैक्षणिक प्रगतीचा आढावा सादर केला. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. सुनील औताडे यांनी केले.

## सांगवी सूर्या झेडपी शाळेच्या विद्यार्थ्यांकडून स्नेहालयातील मुलांना भेटवस्तू

**● पारनेर । वीरभूमी-**



दिवाळीचा आनंद वंचित आणि निराधार मुलांसोबत साजरा करत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सांगवी सूर्या येथील विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपली. विद्यार्थ्यांच्या वतीने स्नेहालय संस्थेतील मुलांना जीवनावश्यक वस्तू भेट देण्यात आल्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी गरजू मुलांप्रती आपुलकी, प्रेम आणि सहकार्याची भावना व्यक्त केली.

दिवाळी हा आनंद, उत्साह आणि प्रकाशाचा सण आहे. या सणाचा आनंद समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा आणि आर्थिक व सामाजिक परिस्थितीमुळे अडचणींचा सामना करणाऱ्या मुलांच्याही चेहऱ्यावर आनंद फुलावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी स्नेहालयातील मुलांना अंगाचा साबण, टूथब्रश, कंगवा, कपडे धुण्याचा साबण यांसह दैनंदिन वापरातील विविध जीवनावश्यक वस्तू भेट देण्यात आल्या.

स्नेहालय संस्था निराधार, वंचित आणि गरजू घटकांतील मुलांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबविते. अशा संस्थांना शैक्षणिक संस्था, विद्यार्थी आणि समाजातील दानशूर व्यक्तींनी सहकार्य केल्यास गरजू मुलांना आधार मिळू शकतो.

सांगवी सूर्या येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमातून दिवाळीत माणुसकीचा दिवा प्रज्वलित करण्याचा संदेश दिला. छोट्याशा मदतीतूनही इतरांच्या जीवनात आनंद निर्माण करता येतो, हे या उपक्रमातून दिसून आले. या उपक्रमासाठी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक संजय शिर्के, उपशिक्षिका उज्वला कोठावळे, विजय गुंजाळ, सुनंदा गंधाडे आणि करण जाधव यांनी परिश्रम घेतले.

# धामणगाव परिसरातील वन्यजीवांसाठी पाणवठ्यांवर टँकरद्वारे पाणी

## पाथर्डी तालुका ग्रामपंचायत अधिकारी संघटना व मित्र परिवाराचा पुढाकार । पावसाळा सुरू होईपर्यंत पाणीपुरवठ्याचे नियोजन

**● पाथर्डी । वीरभूमी-**

उन्हाची तीव्रता वाढत असताना जंगलातील वन्यजीवांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये, यासाठी धामणगाव परिसरातील पाणवठ्यांवर टँकरद्वारे पाणी उपलब्ध करून देण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या संकल्पनेतून आणि जिल्हा परिषदेच्या आवाहनानुसार पाथर्डी तालुका ग्रामपंचायत अधिकारी संघटना व मित्र परिवाराच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

उन्हाळ्यात पाण्याचे नैसर्गिक स्रोत आटत असल्याने वन्यजीवांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागते. ही परिस्थिती लक्षात घेऊन धामणगाव परिसरातील पाणवठ्यांमध्ये टँकरद्वारे पाणी टाकण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पाऊस सुरू होईपर्यंत हा उपक्रम सुरू ठेवण्यात येणार असून, संबंधित संवर्गातील अधिकारी व कर्मचारी वर्षभर या सेवाभावी कार्यासाठी योगदान देणार आहेत.

मुक्या प्राण्यांची तहान भागविणे हे केवळ सेवाकार्य नसून निसर्ग आणि वन्यजीवांप्रती असलेले आपले कर्तव्य आहे. या उपक्रमामुळे वन्यजीवांना पिण्याचे पाणी उपलब्ध होऊन त्यांना दिलासा मिळेल, तसेच वन्यजीवांच्या संरक्षणासाठीही मदत होईल.

या उपक्रमासाठी पंचायत समिती पाथर्डीचे गटविकास अधिकारी राजेंद्र धस, अतिरिक्त गटविकास अधिकारी राजेंद्र म्हस्के, दत्तात्रय रानमळ, संजय गिऱ्हे, रोहिदास आघाव, हनुमान खेडकर, प्रमोद म्हस्के, कृष्णा खटावकर, राहुल गाडेकर, सचिन नजन, गोपीचंद रोंढे, महादेव हाडके, सुनील वाघ, विनोद ओतारी, नितीन बटुळे, राजेंद्र ढाळे, सुरेंद्र बर्डे, नारायण डमाळे, कैलास आकोलकर, अनिल लवांडे, महारुद्र बडे, अमोल भवर, संदीप ढाकणे, मनोरमा कंठाळी, गीता सांगळे, अनिता बनसोडे तसेच इतर संवर्ग बांधव योगदान देत आहेत.

वन्यजीवांचे संरक्षण आणि निसर्गाचे संतुलन राखण्यासाठी नागरिकांनीही पुढाकार घ्यावा, असे आवाहन या उपक्रमाच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

